# <u>आरती श्री मोरयाची</u>

पुजू या मनी मंगलमूर्ती
करू या मोरयाची आरती ||धृ.||

तुंदिलतनु मूषकवाहन
रक्तवर्ण रूप गजवदन
चतुर्भुज एकदंत प्रसन्न
हाती मोदक शस्त्रे शोभती
करू या मोरयाची आरती ||१||

तारकासुरवधा अवतार
करी तोची भक्तांचा उद्धार
भोळ्या भाबड्यांचा जो ईश्वर
योगी मुनी ब्रह्म त्यां मानिती
करू या मोरयाची आरती ||२||

- नारायण
०८/१२/१५